Impact Factor: 6.017
ISSN: 2278-9529

# GALAXY

## International Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed e-Journal

Vol.15, Issue- 1 January 2026

**15 Years of Open Access**

Editor-In-Chief: Dr. Vishwanath Bite
Managing Editor: Dr. Madhuri Bite

www.galaxyimrj.com

# हरियाणातील रोड मराठा समाजः इतिहास आणि वर्तमानस्थिती

श्रीकांत बापूराव बोकारे
संशोधक विद्यार्थी,
संशोधन केंद्र - पानसरे महाविद्यालय अर्जापूर,
ता. बिलोली जि. नांदेड.
प्रो. डॉ. डी. डी. कोल्हेकर
संशोधन मार्गदर्शक,
इतिहास विभाग प्रमुख,
कै. बाबासाहेब देशमुख गोरठेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविध्यालय,
उमरी जि. नांदेड.

सारांशः

रोड मराठा समाज हा हरियाणा व पश्चिम उत्तर प्रदेशातील ऐतिहासिक आणि सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा समाज आहे. पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर स्थायिक झालेल्या मराठा सैनिकांचा संबंध या समाजाशी सांगितला जातो, परंतु स्वतंत्र वंशावळीचा मुद्दा देखील अभ्यासाचा विषय आहे. समाजाची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रचना स्पष्ट असून शिक्षण, रोजगार आणि राजकीय सहभागामुळे आधुनिक काळात तो अधिक सशक्त झाला आहे. पारंपरिक सण, विवाह व धार्मिक विधींनी सांस्कृतिक ओळख टिकवली आहे. एकंदरीत, हा समाज इतिहास, वर्तमानस्थिती आणि सामाजिक-सांस्कृतिक मूल्यांच्या दृष्टिकोनातून अभ्यासासाठी ठरतो.

प्रस्तावना :-

भारतीय समाज हा विविध जाती, जमाती, परंपरा व ऐतिहासिक घटनांनी घडलेला आहे. काळानुसार घडलेल्या युद्धांमुळे, स्थलांतरामुळे आणि सामाजिक बदलांमुळे अनेक समाजांची ओळख बदलत गेली आहे. अशाच बदलांच्या प्रक्रियेतून हरियाणा राज्यातील रोर / रोड मराठा समाज निर्माण झालेला दिसून येतो[१]. रोर / रोड समाज हा प्रामुख्याने हरियाणा व पश्चिम उत्तर प्रदेशातील पानिपत, करनाल, कुरुक्षेत्र, सोनीपत या भागांत आढळतो. हा समाज मुख्यतः शेती करणारा, कष्टाळू आणि सामाजिकदृष्ट्या प्रभावी मानला जातो[२]. लोकपरंपरा व मौखिक कथनांनुसार, या समाजाचा उगम इ.स. १७६१ साली झालेल्या तिसऱ्या पानिपतच्या युद्धानंतर झाल्याचे सांगितले जाते. या युद्धात मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर अनेक मराठा सैनिकांनी महाराष्ट्रात परत न जाता हरियाणातच स्थायिक होऊन शेती व स्थानिक जीवन स्वीकारले, अशी धारणा समाजात प्रचलित आहे[३]. मात्र या लोकपरंपरांना ऐतिहासिक व वैज्ञानिक पुरावे सर्वत्र उपलब्ध नाहीत. काही इतिहासकार रोड समाजाचा उगम हा स्थानिक जमातींशी जोडतात, तर अलीकडील जनुक–अभ्यासांमध्येही रोड समाजाची वंशावळ मराठ्यांपेक्षा वेगळी असल्याचे सूचित केले आहे[४]. त्यामुळे इतिहास, लोकपरंपरा आणि आधुनिक अभ्यास यांमध्ये आढळणाऱ्या मतभेदांचा सखोल अभ्यास होणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रोड समाजाचे योगदान शेती, सैन्यदल, प्रशासन तसेच क्रीडा क्षेत्रात दिसून येते. ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता नीरज चोप्रा याच्या यशामुळे या समाजाची ओळख

देशपातळीवर पोहोचली आहे[५]. यामुळे आधुनिक भारतीय समाजातील जातीय ओळख, अभिमान व प्रतिनिधित्व या मुद्द्यांचा अभ्यास करण्यासाठी रोड समाज महत्त्वाचा ठरतो. याशिवाय हरियाणा राज्यातील राजकारणात रोड समाजाला एक संघटित आणि प्रभावी मतदारवर्ग म्हणून पाहिले जाते. निवडणुका, सामाजिक चळवळी व राजकीय निर्णय प्रक्रियेत या समाजाची भूमिका लक्षणीय आहे[६]. म्हणूनच रोड / रोड मराठा समाजाचा अभ्यास हा केवळ भूतकाळापुरता मर्यादित न राहता तो समकालीन समाज आणि राजकारण समजून घेण्यासाठीही आवश्यक ठरतो. प्रस्तुत शोध निबंधात "हरियाणातील रोड मराठा समाजः इतिहास आणि वर्तमानस्थिती" चा अभ्यास करण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१) रोड मराठा समाजाची भौगोलिक, लोकसंख्या, सामाजिक–सांस्कृतिक व आर्थिक रचना स्पष्ट करणे.

२) सध्याच्या काळातील शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्थिती आणि समस्या आणि संधी यांचे विश्लेषण अध्ययन करणे.

संशोधन पद्धती (**Methodology**) :-

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक (Descriptive) व विश्लेषणात्मक (Analytical) या संशोधन पद्धतींचा अवलंब करण्यात आलेला आहे. संशोधन विषयाच्या ऐतिहासिक, सामाजिक व समकालीन पैलूंचे सुस्पष्ट वर्णन करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आला

आहे. तसेच उपलब्ध माहितीचे अर्थ लावणे, तुलना करणे व त्यातून निष्कर्ष काढण्यासाठी विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. माहिती संकलनासाठी दुय्यम साधनांचा (Secondary Sources) उपयोग करण्यात आला असून त्यामध्ये पुस्तके, संशोधन लेख, शोधनिबंध, संदर्भग्रंथ, शासकीय अहवाल, जनगणना अहवाल तसेच विश्वासार्ह वृत्तपत्रे व नियतकालिके यांचा समावेश आहे. या सर्व स्रोतांमधून प्राप्त माहितीचे चिकित्सक विश्लेषण करून विषयाशी संबंधित निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

संबंधित साहित्याचा आढावा (**Literature Review**) :-

१) रोड (रोर) समाजाची सामाजिक रचना व ओळख :

हरियाणा व पश्चिम उत्तर प्रदेशात आढळणारा रोड (रोर) समाज हा प्रामुख्याने कृषीप्रधान असून सामाजिकदृष्ट्या प्रभावी मानला जातो. या समाजाची गोत्रप्रणाली, विवाहपद्धती, सण-उत्सव व धार्मिक आचार यांचा अभ्यास Anthropological Survey of India यांच्या ग्रंथामध्ये सविस्तरपणे करण्यात आला आहे. या अभ्यासातून रोड समाजाची सामाजिक संघटना व हरियाणातील जातीय संरचनेतील त्यांचे स्थान स्पष्ट होते.[७]

२) रोड समाजाचा इतिहास व मराठा वंशजत्वाचा दावा :

काही ऐतिहासिक लेखन व लोकपरंपरांनुसार रोड समाज स्वतःला इ.स. १७६१ च्या तिसऱ्या पानिपत युद्धानंतर उत्तर भारतात स्थायिक झालेल्या मराठा सैनिकांचा वंशज मानतो.

पानिपतच्या युद्धानंतर अनेक मराठा सैनिकांनी महाराष्ट्रात परत न जाता हरियाणातच राहून शेती स्वीकारल्याचे कथन आढळते. तथापि, या दाव्यांबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद असून त्यावर चिकित्सक अभ्यासाची आवश्यकता असल्याचेही या साहित्यामधून स्पष्ट होते.[८]

३) वर्तमान सामाजिक-राजकीय स्थिती :

समकालीन अभ्यास व वृत्तपत्रीय लेखांनुसार रोड समाजाचे महत्त्व आज हरियाणातील राजकारणात वाढलेले आहे. निवडणुकीतील मतदारवर्ग, सामाजिक संघटना तसेच क्रीडा क्षेत्रातील यश (उदा. नीरज चोप्रा) यांमुळे या समाजाची ओळख अधिक ठळक झाली आहे. त्यामुळे आधुनिक काळातील जातीय ओळख व प्रतिनिधित्व समजून घेण्यासाठी रोड समाज हा उपयुक्त अभ्यासविषय ठरतो.[९]

रोड मराठा समाजाची रचना :

रोड मराठा समाज मुख्यतः हरियाणा राज्यातील पानिपत, करनाल, कुरुक्षेत्र, सोनीपत आणि जींद जिल्ह्यांत आढळतो. हा समाज प्रामुख्याने कृषिप्रधान असून शेती, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय हा त्याचा मुख्य व्यवसाय आहे. सामाजिक रचना पारंपरिक गोत्रप्रणाली, विवाह पद्धती आणि संयुक्त कुटुंबावर आधारित आहे, ज्यात सन्मान, प्रतिष्ठा आणि शिस्त यांना महत्त्व आहे. सांस्कृतिकदृष्ट्या सण, उत्सव, विवाह व धार्मिक विधींनी समाजाची ओळख टिकवली आहे. आधुनिक काळात शिक्षण, रोजगार आणि शहरीकरणामुळे समाजाची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनशैली बदलत आहे.

१) भौगोलिक रचना :

रोड मराठा समाज प्रामुख्याने हरियाणा राज्यातील पानिपत, करनाल, कुरुक्षेत्र, सोनीपत, कैथल व जींद जिल्ह्यांमध्ये आढळतो. हे क्षेत्र मुख्यतः शेतीयोग्य सपाट जमिनीने व्यापलेले असून त्यामुळे समाजाची स्थिर वस्ती शक्य झाली आहे. पश्चिम उत्तर प्रदेशातील काही भागांमध्ये ही वस्ती अल्प प्रमाणात दिसते. या समाजाचे ग्रामीण जीवन, शेतीवर आधारित आहे आणि ते स्थानिक जलस्रोत व हवामानाशी जुळवून घेतले आहे. शहरीकरणामुळे काही युवक शहरात स्थलांतर करत आहेत, ज्यामुळे पारंपरिक जीवनशैलीत बदल होत आहे. यामुळे समाजाची भौगोलिक ओळख केवळ भौगोलिक पातळीवर नाही तर आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही स्पष्ट होते. समाजाची स्थायिकता व भूगोलाशी निगडीत व्यवसायिक संरचना त्यांना स्थानिक राजकारण व सामाजिक व्यवस्थेतही प्रभावी बनवते.

२) लोकसंख्या रचना :

रोड समाजाची एकूण लोकसंख्या तुलनेने मर्यादित असली तरी हा समाज सामाजिकदृष्ट्या प्रभावी मानला जातो. कुटुंब संरचनेत मुख्यतः संयुक्त कुटुंब आढळतात, ज्यामुळे सामाजिक बंध मजबूत राहतात, परंतु शहरांमध्ये विभक्त कुटुंब पद्धती वाढत आहे. समाजातील युवकांचे प्रमाण अधिक आहे, ज्याचा प्रभाव सामाजिक सहभाग, आर्थिक उपक्रम व शिक्षणावर दिसून येतो. स्त्री–पुरुष प्रमाण संतुलित असून मुलींच्या शिक्षणाकडे हळूहळू कल दिसतो. समाजातील लोकसंख्येचे वय, कौशल्य व अनुभव यांच्या आधारावर विविध सामाजिक व आर्थिक

कार्ये पार पाडली जातात. यामुळे समाजाची लोकसांख्यिकीय रचना त्यांच्या सामाजिक व राजकीय प्रभावाशी थेट संबंधित आहे.

३) सामाजिक रचना :

रोड समाजामध्ये गोत्रप्रणाली अस्तित्वात आहे, ज्यामुळे विवाह पद्धती नियंत्रित राहतात. गोत्रबाह्य विवाहाला प्राधान्य दिले जाते आणि समाजात सन्मान, प्रतिष्ठा, शौर्य व शिस्त या मूल्यांना महत्त्व आहे. पंचायत व समाज सभा यांसारख्या निर्णय प्रक्रियेत समाजाचे सक्रिय योगदान दिसते. सामाजिक सहकार्य आणि समुदायाभिमान यामुळे अडचणींवर मात करणे व एकत्रित सामाजिक उपक्रम चालवणे सोपे जाते. समाजातील मूल्ये आणि नैतिकता त्यांच्या शैक्षणिक, आर्थिक व क्रीडा क्षेत्रातील कामगिरीवरही परिणाम करतात. यामुळे समाजाच्या संघटनात्मक रचनेचा अभ्यास अत्यंत महत्वाचा ठरतो.

४) सांस्कृतिक रचना :

रोड मराठा समाजाने आपल्या सांस्कृतिक परंपरा जपल्या आहेत. प्रमुख सण – होळी, दिवाळी, दशहरा यांना समुदायाने उत्साहाने साजरा केले जाते. विवाह, जन्म व मृत्यू विधींमध्ये पारंपरिक पद्धती पाळल्या जातात. संगीत, नृत्य व लोककथा समाजातील सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक आहेत. समाजातील जेष्ठ लोकांकडून ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहचते. सांस्कृतिक

अभ्यासातून समाजाची ऐतिहासिक ओळख व सामाजिक मूल्ये स्पष्ट होतात. आधुनिक काळात शहरीकरणामुळे काही सांस्कृतिक बदल दिसतात, परंतु परंपरेची मुळे अजूनही ठळक आहेत.

५) आर्थिक रचना :

समाजाचे मुख्य उत्पन्न शेतीवर आधारित आहे, ज्यात गहू, तांदूळ, ऊस, गवार यांचा समावेश आहे. पशुपालन व दुग्धव्यवसाय हा दुसरा महत्त्वाचा आर्थिक स्रोत आहे. शासकीय व खासगी नोकऱ्यांमध्ये समाजातील युवकांचा सहभाग वाढत आहे, ज्यामुळे आर्थिक स्थिती सुधारली आहे. हरितक्रांतीनंतर तंत्रज्ञानाचा उपयोग वाढल्याने शेतीत उत्पादकता वाढली आहे. क्रीडा आणि सैन्य क्षेत्रातील सहभागामुळेही काही कुटुंबांची आर्थिक व सामाजिक स्थिती बळकट झाली आहे. समाजातील आर्थिक स्थैर्य त्यांना स्थानिक राजकारण आणि सामाजिक प्रभावात मजबूत स्थान मिळवून देते.

६) शिक्षण व सामाजिक बदल :

समाजातील युवक उच्च शिक्षणाकडे झुकलेले आहेत, विशेषतः शहरी भागात. मुलींना शिक्षणाच्या संधी अधिक मिळत असल्यामुळे लिंग समानतेची दृष्टीकोन हळूहळू बदलत आहे. माहिती तंत्रज्ञान, शहरीकरण आणि रोजगाराच्या संधीमुळे पारंपरिक जीवनशैलीत बदल दिसत आहेत. या बदलांमुळे समाजातील व्यक्ती आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून अधिक

सक्षम होत आहेत. शिक्षणाच्या पातळीवर वाढ झाल्याने सामाजिक सशक्तीकरण आणि राजकीय जागरूकता वाढत आहे.

७) राजकीय व सामाजिक सहभाग :

रोड समाज हरियाणा राज्यातील निवडणुकांमध्ये एक संघटित आणि प्रभावी मतदारवर्ग म्हणून ओळखला जातो. पंचायत, समाज सभा आणि विविध सामाजिक संघटनांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग दिसतो. राजकीय प्रतिनिधित्व, स्थानिक धोरणे आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेत रोड समाजाचा प्रभाव महत्त्वाचा आहे. आधुनिक काळातील राजकीय जागरूकता आणि सामाजिक संघटनांमधील सहभागामुळे समाजाची ओळख अधिक ठळक झाली आहे.

सध्याच्या काळातील शैक्षणिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक स्थिती आणि समस्या आणि संधी

समकालीन काळात रोड मराठा समाजातील युवक उच्च शिक्षणाकडे झुकलेले आहेत, विशेषतः शहरी भागात महाविद्यालय व व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश वाढला आहे. आर्थिक दृष्टिकोनातून हा समाज शेती, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगावर अवलंबून असून काही युवक खासगी नोकऱ्या आणि व्यवसायात गुंतलेले आहेत. राजकीय दृष्टिकोनातून समाज हरियाणा निवडणुकांमध्ये प्रभावी मतदारवर्ग असून पंचायत आणि समाज सभांमध्ये सक्रिय सहभाग घेतो. सांस्कृतिकदृष्ट्या सण, विवाह आणि धार्मिक विधींनी परंपरा टिकवली

आहे, तरी शहरीकरणामुळे काही बदल दिसत आहेत. मुख्य समस्या म्हणजे शैक्षणिक सुविधा कमी असणे, आर्थिक असमानता आणि जमीनविवाद, तर संधी शिक्षण, रोजगार, क्रीडा आणि सामाजिक व राजकीय सहभागातून समाजाची प्रगती साधणे आहे.

१) शैक्षणिक स्थिती :

रोड मराठा समाजातील युवक-युवतींमध्ये शिक्षणाची पातळी हळूहळू वाढत आहे. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षणाकडे देखील लक्ष वाढत आहे. विशेषतः शहरी भागातील युवक महाविद्यालय, व्यावसायिक अभ्यासक्रम आणि माहिती तंत्रज्ञानात प्रवेश घेण्यास प्राधान्य देतात. मुलींच्या शिक्षणाकडे हळूहळू कल दिसतो, ज्यामुळे लिंग समानतेचा दृष्टिकोन बदलत आहे. परंतु, ग्रामीण भागातील काही गावे अजूनही शिक्षणाच्या संधींपासून दूर आहेत. शिक्षकांची कमतरता, शाळा–महाविद्यालयांची उपलब्धता आणि आर्थिक अडचणी यामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेत फरक पडतो. शिक्षणाची वाढ समाजाच्या सशक्तीकरणासाठी, रोजगार संधींसाठी आणि सामाजिक जागरूकतेसाठी महत्त्वाची आहे.

२) आर्थिक स्थिती :

समाजाचे मुख्य उत्पन्न शेतीवर आधारित असून गहू, तांदूळ, ऊस, गवार यांचे उत्पादन प्रामुख्याने केले जाते. त्याचबरोबर पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि छोटे उद्योग देखील आर्थिक योगदान देतात. शहरीकरणामुळे काही युवक खासगी नोकऱ्या आणि व्यवसायात गुंतलेले आहेत,

ज्यामुळे उत्पन्न वाढले आहे. तथापि, काही कुटुंबांमध्ये आर्थिक स्थैर्यात फरक दिसतो, विशेषतः शेतीवर अवलंबून राहणाऱ्या कुटुंबांमध्ये. आर्थिक संधींमध्ये असमानता, पिकांच्या बाजारभावातील उतार-चढाव, जमीनविषयक विवाद या समस्या अजूनही आहेत. या सर्व बाबी समाजाच्या सामाजिक आणि राजकीय सहभागावर प्रभाव टाकतात.

३) राजकीय स्थिती :

रोड मराठा समाज हरियाणातील निवडणुकीत प्रभावी मतदारवर्ग म्हणून ओळखला जातो. समाजाचे स्थानिक पंचायत, समाज सभा आणि राजकीय संघटनांमध्ये सक्रिय आहे. निवडणूक प्रक्रियेत आणि स्थानिक राजकारणात रोड समाजाचे प्रतिनिधित्व महत्त्वाचे आहे. तरुण पिढी राजकीय चळवळींमध्ये भाग घेते, ज्यामुळे समाजाची भूमिका अधिक दृढ होत आहे. परंतु, काही वेळा समाजातील राजकीय जागरूकता ग्रामीण आणि शहरी भागात वेगळी असल्याने मतसत्तेचा प्रभाव बदलतो. राजकीय सहभागामुळे समाजाच्या समस्यांवर लक्ष वेधणे आणि त्यांच्या हितासाठी धोरणे राबवणे शक्य होते.

४) सांस्कृतिक स्थिती :

समाजाने पारंपरिक सण, उत्सव, संगीत व नृत्य जपलेले आहेत. होळी, दिवाळी, दशहरा हे प्रमुख सण उत्साहाने साजरे केले जातात. विवाह, जन्म, मृत्यू विधी पारंपरिक पद्धतीने पाळले जातात. तथापि, आधुनिक काळात शहरीकरण आणि जागतिक संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो.

तरुण पिढी काही पारंपरिक मूल्यांपासून हळूहळू दूर जाते, परंतु समाजातील जेष्ठ लोकांनी सांस्कृतिक परंपरा टिकवून ठेवण्याचे प्रयत्न केले आहेत. सांस्कृतिक सहभाग समाजातील एकता, समाजभिमान आणि सामाजिक ओळख मजबूत करण्यासाठी महत्त्वाचा आहे.

५) समस्या व संधी :

समाजातील प्रमुख समस्या म्हणजे शैक्षणिक सुविधा, आर्थिक असमानता, पिकांच्या बाजारभावातील अनिश्चितता, जमीनविषयक विवाद, आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधा कमी असणे. संधींचा विचार केला तर युवकांच्या शिक्षणात वाढ, रोजगार व व्यवसायातील विविधता, क्रीडा व सैन्य क्षेत्रातील संधी, तसेच राजकीय सहभाग हे समाजाची प्रगतीसाठी मोठे साधन ठरू शकतात. सामाजिक-सांस्कृतिक सहभाग व नवे उद्योग देखील समाजासाठी प्रगतीची संधी निर्माण करतात. यामुळे आधुनिक काळात समाजाची ओळख, सशक्तीकरण आणि स्थानिक-राजकीय प्रभाव वाढवता येतो.

निष्कर्ष

रोड मराठा समाजाचा इतिहास पानिपतच्या तिसऱ्या युद्धानंतर स्थायिक झालेल्या मराठा सैनिकांशी जोडला जातो, परंतु काही अभ्यासानुसार त्यांची स्वतंत्र वंशावळ असण्याची शक्यता आहे, त्यामुळे ऐतिहासिक दृष्टिकोनातून अधिक संशोधन आवश्यक आहे. समाज प्रामुख्याने हरियाणा राज्यातील ग्रामीण भागात वस्ती आहे, परंतु शहरीकरणामुळे त्यांची सामाजिक, आर्थिक

व सांस्कृतिक जीवनशैली बदलत आहे. पारंपरिक गोत्रप्रणाली, विवाह पद्धती, सण-उत्सव आणि धार्मिक परंपरा जपल्या जातात, तर शौर्य, प्रतिष्ठा आणि शिस्त ही मूल्ये समाजात दृढ आहेत. आर्थिकदृष्ट्या हा समाज मुख्यतः शेतीवर अवलंबून असून पशुपालन, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग आणि खासगी नोकऱ्या महत्त्वाच्या आहेत. शिक्षण आणि आधुनिक कौशल्यांमध्ये वाढ, मुलींच्या शिक्षणाची वाढती पातळी आणि रोजगाराच्या संधी समाजाच्या सशक्तीकरणास हातभार लावत आहेत. राजकीय दृष्टिकोनातून रोड समाज निवडणुकांमध्ये प्रभावी असून स्थानिक पंचायत आणि समाज सभांमध्ये सक्रिय सहभाग दिसतो. समस्या म्हणून शैक्षणिक सुविधा, जमीनविवाद आणि आर्थिक असमानता राहिल्या आहेत, तर संधी म्हणून शिक्षण, व्यवसाय, क्रीडा व सामाजिक सहभाग समाजाची प्रगती साधतात. एकंदरित, रोड मराठा समाज हा ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण असून आधुनिक काळात त्याची ओळख अधिक सशक्त आणि जागरूक झाली आहे.

संदर्भ :

१) इब्बेटसन, डी. (१८८३), Punjab Castes.

२) हरियाणा जनगणना अहवाल (२०११).

३) सरदेसाई, गो. स. (१९४६), मराठ्यांचा इतिहास, खंड ३.

४) Reich, D. et al. (2018), The Genomic Formation of South and Central Asia.

५) क्रीडा मंत्रालय, भारत सरकार – ऑलिम्पिक अहवाल (२०२१).

६) Jaffrelot, C. (2012), Caste and Politics in India.

७) Anthropological Survey of India (२०१०), People of India : Haryana, भारत सरकार, नवी दिल्ली.

८) सरदेसाई, गो. स. (१९४६), मराठ्यांचा इतिहास, खंड ३, मुंबई.

९) Jaffrelot, C. (२०१२), Caste and Politics in India, Oxford University Press.